MHAU060020342025

## दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४७९/२०२५

## नि. क्र. ०१ खालील आदेश

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २ नुसार वारसा दाखला मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे–**

२. अर्जदार क्रमांक १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे कचरु धोंडीबा सोनवणे हे होते. ते दिनांक २७.०४.२०२५ रोजी मयत झाले आहेत. मयताची आई पार्वताबाई धोंडीबा सोनवणे या दिनांक २०.०६.२०२२ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत कचरु धोंडीबा सोनवणे यांच्या मृत्युनंतर अर्जदार क्रमांक १ ते ४ हेच त्यांचे कायदेशीर वारस असुन त्यांना शासकीय, निमशासकिय व इतर कामकाजांसाठी वारस दाखल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत अर्ज दाखल झाल्यानंतर अर्जाची नोटीस दि. २६/११/२०२५ रोजीच्या दैनिक 'तरुणभारत' या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करुन अर्जातील मागणीबाबत हरकती मागविल्या. परंतु त्या अनुषंगाने कुणीही त्रयस्थ व्यक्तीनी न्यायालयात हजर होवून सदर अर्जाबाबत विहित कालावधीत कोणताही उजर नोंदविलेला नाही.

४. माझे समोर अर्ज निर्णित करण्यास खालील मुद्दे विचारधीन झाले आहेत. त्यांचा निष्कर्ष मी त्याखाली नमुद करणमिमांसेसहित नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार हे मयत कचरु धोंडीबा सोनवणे यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत हे शाबीत करतात काय? | होकारार्थी |
| ०२. | अर्जदार यांनी मागणीप्रमाणे वारस दाखला मिळणेस पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| ०३. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

**:– का र ण मि मां सा –:**

५. अर्जाच्या पुष्ट्यर्थ अर्जदार क्र. २ यांनी न्यायालयात हजर होवून स्वतःचा पुरावा दाखल केला व त्यांच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जातील कथनांचा पुनःरुच्चार केला आहे. तसेच त्यांनी मयत कचरु धोंडीबा सोनवणे व पार्वताबाई धोंडीबा सोनवणे यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची प्रत, अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या आधार कार्डांच्या सत्य प्रती, कौटुंबिक शिधापत्रिका आणि दैनिक 'तरुणभारत' या दैनिक वृत्तपत्राची दिनांक २६.११.२०२५ रोजीची प्रत कागदपत्राच्या यादीसोबत दाखल केली आहेत.

६. अर्जदार यांचा अर्ज, त्यामधील मागणी बाबत स्थानिक दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिर नोटिस देऊन हरकती मागविल्या होत्या. परंतु प्रस्तुत अर्ज व त्यामध्ये केलेल्या मागणीच्या अनुषंगाने न्यायालयात कोणीही हजर होऊन हरकत घेतलेली नाही. अर्जदारांनी सादर केलेला लेखी व तोंडी पुरावा कोणीही आव्हानीत केलेला नाही. अर्जदार यांनी सादर केलेला पुरावा कोणीही आव्हानीत केला नसल्याने त्यावर विश्वास ठेवणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या अर्जातील अभिकथनांचा आणि न्यायालयासमोर सादर केलेला पुरावा यांचा सारासार विचार करता मयत कचरु धोंडीबा सोनवणे हे अर्जदार क्र. १ यांचे

पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील आहे, ही बाब या ठिकाणी दिसत आहे. अर्जदार हेच मयत कचरु धोंडीबा सोनवणे यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत. करीता मी मुद्दा क्र. १ व २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २ | अर्जदार क्र. १ रुख्मण कचरु सोनवणे या पत्नी या नात्याने, अर्जदार क्र. २ सोमीनाथ कचरु सोनवणे, अर्जदार क्र. ३ गोरख कचरु सोनवणे व अर्जदार क्र. ४ नानासाहेब कचरु सोनवणे हे मुले या नात्याने **मयत कचरु धोंडीबा सोनवणे** यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत, हे जाहीर करण्यात येत आहे. |
| ३ | अर्जदार क्र. १ ते ४ यांचे नांवे बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे परिशिष्ट 'ब' नुसार विहित नमुन्यात दाखला देण्यात यावा. |

NITIN DHOKE
Digitally signed by NITIN DHOKE
Date: 2026.07.07 16:03:16 +0530

**दिनांक:-०७.०७.२०२६**

**( एन. आर. ढोके)**
**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**कन्नड**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rajesh M. Sonawane |
| Name of the Court | : | Shri. N. R. Dhoke<br>Jt. Civil Judge Junior Division, Kannad. |
| Date of the pronounce of order | : | 07.07.2026 |
| Order signed by the presiding officer on | : | 07.07.2026 |
| Order uploaded on | : | 07.07.2026 |